# सात्त्विक मेंदी

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


**- मनोगत ७**

**- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य ८**

**- 'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ ११**

**- काही आध्यात्मिक संज्ञांचा अर्थ १३**

**१. 'मेंदी' या शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ १४**

**२. मेंदी काढण्याचा भारतातील इतिहास १४**

**३. धर्मशास्त्रानुसार पुरुषांनी हाता-पायांवर मेंदी काढणे अयोग्य असून केवळ स्त्रियांनीच मेंदी काढणे योग्य असणे १५**

**४. मेंदी लावण्यामागील उद्देश १७**

४ अ. शृंगार १७

४ आ. धार्मिक परंपरेचे पालन १७

४ इ. औषध म्हणून उपयोगी १७

**५. मेंदी काढल्यामुळे होणारे विविध लाभ १७**

* सौंदर्यवृद्धी १७
* मन उत्साही होणे १७
* मेंदीच्या गंधातून मारक शक्तीचे प्रक्षेपण होऊन देहाचे रक्षण होणे १८
* मेंदीच्या सात्त्विक कलाकृतीमुळे ब्रह्मांडमंडलातील विविध देवतांची तत्त्वे देहाकडे आकृष्ट होणे १८

**६. मेंदीचा रंग २०**

* मेंदी रंगण्यामागील विविध कारणे २०
* रंगलेल्या मेंदीचा रंग कसा असावा ? २२
**७. हाता-पायांवर मेंदीने कलाकृती काढण्याच्या विविध पद्धती २३**
**८. हाता-पायांवर मेंदीने कलाकृती काढण्यापूर्वी करावयाची सिद्धता २८**
८ अ. कलाकृतीची निवड करणे २८
८ आ. मेंदी भिजवण्याची पद्धत २८
८ इ. आवश्यक गोष्टी जवळ ठेवणे २९
**९. मेंदीने कलाकृती काढणे ३०**
**१०. मेंदी काढून झाल्यावर करावयाच्या कृती ३०**
* मेंदी लगेच सुकून खाली पडू नये, यासाठी काय काळजी घ्यावी ? ३०
* मेंदी पूर्ण सुकल्यावर काय करावे ? ३१
**११. हाता-पायांवर कलाकृती काढण्याचा मेंदीव्यतिरिक्त अन्य पारंपरिक प्रकार ३१**
**१२. सद्यःस्थितीत मेंदी कलेत शिरलेले अपप्रकार ( गैरप्रकार ) ३३**
१२ अ. कलाकृतींतील अपप्रकार ३३
१२ आ. मेंदी सिद्ध करणाऱ्या आस्थापनांकडून होत असलेले अपप्रकार ३४
१२ इ. कोनासाठी वापरलेली ‘ग्लिटर’ मेंदी, रासायनिक घटक मिसळलेली मेंदी आणि रासायनिक घटक मिसळलेला अळता ३५
**१३. मेंदीच्या कलाकृती ३७**
१३ अ. काळानुसार मेंदीच्या कलाकृतीची सत्त्वगुणाकडून तमोगुणाकडे झालेली वाटचाल ३७
१३ आ. मेंदीच्या असात्त्विक आणि सात्त्विक कलाकृतींचे संबंधित व्यक्तींवर होणारे, तसेच अन्य परिणाम ३८
**१४. मेंदीच्या सात्त्विक कलाकृतींच्या निर्मितीची सेवा करतांना साधिकांना शिकायला मिळालेली सूत्रे आणि त्यांना आलेल्या अनुभूती ५१**
**१५. विविध सात्त्विक कलाकृती ६५**

# मनोगत

सण-समारंभांच्या प्रसंगी किंवा एरव्हीही मोकळ्या वेळी मुली, स्त्रिया मेंदी काढायला बसतात. मेंदीचे आयते कोन आणून एखाद्या पुस्तकाच्या अथवा पूर्वानुभवाच्या आधारे एकमेकींच्या हाता-पायांवर मेंदी काढली जाते. आजकाल विवाह समारंभाच्या वेळी मेंदी काढणाऱ्या व्यावसायिकाला बोलावून मेंदी काढून घेतली जाते. या सर्व प्रसंगी मेंदीकडे केवळ मनोरंजनाचे साधन अथवा उपचार म्हणून पाहिले जाते. व्यावसायिक तिच्याकडे 'धन मिळवण्याचे एक साधन' म्हणून पहातात; परंतु मेंदीचे महत्त्व त्याहून पुष्कळ अधिक आहे. सहस्त्रो वर्षे हिंदु संस्कृतीचा अविभाज्य घटक असलेली मेंदी वातावरणातील देवतांची, तसेच अन्य सात्त्विक स्पंदने आकृष्ट करून घेऊन संबंधित स्त्रियांना त्यांचा लाभ करून देत आली आहे. याविषयीची माहिती, तसेच मेंदी काढण्याच्या योग्यायोग्य पद्धती, सद्यःस्थितीत मेंदीकलेत शिरलेले अपप्रकार आदींविषयीचे विवेचन या ग्रंथात देण्यात आले आहे.

सर्वसाधारणतः मेंदीच्या पुस्तकांत दिलेल्या बहुतेक कलाकृती असात्त्विक असतात. त्या काढल्यामुळे त्रासदायक शक्तींचा त्रास होण्याचा धोका असतो. याउलट देवतेच्या तत्त्वाशी संबंधित कलाकृती काढल्यामुळे ती काढणारी व्यक्ती अन् काढून घेणारी स्त्री या दोहोंवर आध्यात्मिक उपाय होऊन त्यांना त्रास होत असल्यास तो उणावतो. यासाठी या ग्रंथात विविध देवतांची तत्त्वे आकृष्ट करणाऱ्या कलाकृती दिल्या आहेत. त्याचसह केवळ वाचकांच्या माहितीसाठी काही तामसिक कलाकृतींची उदाहरणे दिली आहेत.

समाजातील मेंदी काढणाऱ्या व्यक्ती आणि काढून घेणाऱ्या स्त्रिया, तसेच त्या कलाकृती पहाणारे यांना या ग्रंथातील सात्त्विक कलाकृतींचा आध्यात्मिक लाभ व्हावा आणि त्यांच्यामध्ये सात्त्विकतेची ओढ निर्माण व्हावी, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! - **संकलक**